धक्का!!

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । गुरुवार, दि. २८ मार्च २०२४ । वर्ष : २२ वे अंक : १७८ वा किंमत : ५ रुपये पाने १२


**आजचा सामना**

RAJASTHAN ROYALS Vs DELHI CAPITALS

राजस्थान रॉयल्स वि. दिल्ली कॅपिटल्स्

वेळ : ७.३० वा. स्थळ : जयपूर

## मोहिते-पाटलांचा निर्णय पक्का

# 'कमळ' घराबाहेर काढा अन् 'तुतारी' फुंका!!




✔ देवानंद साळवे/अकलूज

**माढा लोकसभेची उमेदवारी भाजपानं नाकारल्यानंतर स्वाभीमानी बाणा दाखवत अखेर अकलूजकर मोहिते-पाटील यांनी बंडाचं निशाण फडकावलंचं. शरद पवार राष्ट्रवादी गटात प्रवेश करुन तुतारीच्या चिन्हावर लढण्याचं रणशिंग आज बुधवारी अकलूजच्या मोहिते-पाटील घराण्यानं त्यांच्या 'शिवरत्न' बंगल्यावर फुंकलं. धैर्यशील मोहिते-पाटील यांना माढा लोकसभेच्या आखाड्यात उतरवायचं 'आमचं ठरलंय', हेच केवळ न सांगता, 'आमचं फिक्स् असतंय' हेच त्यांच्या समर्थकांनी दाखवून दिलं. बाळदादा ऊर्फ जयसिंह मोहिते-पाटील यांनीच आज प्रसारमाध्यमांपुढं येऊन स्पष्टचं सांगितलं. शरद पवार राष्ट्रवादी गटात मोहिते-पाटील गटाचा प्रवेश होईल, तुतारी या चिन्हावर धैयशील मोहिते-पाटील लढतील.**

विशेषत्वे, माढा लोकसभेच्या उमेदवारीवरुन मोहिते-पाटील आणि त्यांच्या समर्थकांमध्ये पसरलेली नाराजी दुर होईल, कोणत्याही परिस्थितीत ते भाजपाच्या विरोधी भूमिका घेणार नाहीत अन् त्यांना



ते परवडणारेदेखील नाही, असा भाजपवाल्यांना विश्वास होता, तो चुकीचा ठरला. आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांना भाजपामध्ये राहायला सांगून मोहिते-पाटील परिवारातील सर्व सदस्यांनी 'तुतारी' चिन्हावर लढण्याच्या निर्णयावर एकमताची मोहर उमटविली.

**रामराजे निंबाळकर- मोहिते पाटील गट एकत्र**

मंगळवारी रात्री उशिरापर्यंत फलटणचे रामराजे निंबाळकर गट समर्थक व अकलूजच्या मोहिते-पाटील गटाच्या समर्थकांची उशिरापर्यंत बैठक फलटणमध्ये चालली. माढा लोकसभा मतदारसंघातून धैर्यशील मोहिते-पाटील यांनी तुतारी चिन्हावर निवडणूक लढवावी याबाबत चर्चा झाली. या बैठकीसाठी धैर्यशील मोहिते-पाटील यांचे काका विजयसिंह मोहिते-पाटील, जयसिंह मोहिते-पाटील, मदनसिंह मोहिते-पाटील यांची उपस्थिती होती. यावेळी निंबाळकर व मोहिते-पाटील यांच्या नव्या पिढीतील सर्व सदस्य उपस्थित होते.

**प्रशांत परिचारक आऊट अमोल कोल्हे इन**

मंगळवारी सकाळीच माढा लोकसभा मतदारसंघाचे क्लस्टर प्रमुख आणि भाजपचे नेते प्रशांत परिचारक हे 'शिवरत्न' बंगल्यावर आले होते. यावेळी त्यांच्याशी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला असता ते म्हणाले, मोहिते पाटील यांची कौटुंबिक भेट घेतली असे सांगत त्यांनी मुख्य विषयाला बगल दिली. तरीही भाजपकडून ते निरोप घेऊन आले होते का? याची मात्र चर्चा रंगली होती.

दरम्यान परिचारक आऊट होताच 'शिवरत्न'वर खासदार अमोल कोल्हे या शरद पवार यांच्या गटाच्या नेत्याची एन्ट्री झाली. त्यांनीही लग्न समारंभानिमित्त अकलूज परिसरात आलो असता मोहिते-पाटील यांच्या कुटुंबीयांशी जुने नाते असल्याने भेटण्यासाठी आलो होतो. इथे आलो असता बऱ्याचशा मोहिते पाटील समर्थकांची इच्छा अशीच आहे की त्यांनी स्वाभिमानाची तुतारी हातात घ्यावी. काही दिवसातच माढ्याच्या उमेदवारीबाबतचे चित्र आपल्या सर्वांसमोर येईल तूर्तास वेट अँड वॉच... अशी माहिती दिली असली तरीही शिवरत्नवर मात्र कमळ आऊट आणि तुतारी इन असेच चित्र आज पाहायला मिळाले.

### खासदार रणजितसिंहानी मोहिते-पाटलांना डिवचलं



उमेदवारीवरुन नाराज असलेल्या मोहिते-पाटील यांच्या भूमिकेवर अत्यंत बारीक लक्ष ठेऊन असलेल्या खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना जेव्हा मोहिते-पाटील हे तुतारी घेऊन आपल्या विरोधात लढताहेत हे माहित झाले तेव्हा निंबाळकरांनी आपला नूर लगेच बदलला. मोहिते-पाटील आणि त्यांचे समर्थक कितीही टोकाची भूमिका घेत राहिले तरी संयम दाखवविलेल्या भाजपाचे खासदार नाईक-निंबाळकर यांच्या संयमाचा आज अखेर बांध फुटला. त्यांनी मोहिते-पाटील यांना चांगलंचं डिवचलं.'उमेदवारी मागून मिळत नसते, त्यासाठी पक्षनिष्ठा असावी लागते' असा खोचक आणि उपरोधिक टोला लगावला.

---

## धाडसी निर्णय घेताना

# काय सेटिंग, काय बेटिंग?



✔ शिवाजी भोसले/सोलापूर

**वास्तविक भाजपाने उमेदवारी नाकारली तरी माढा लोकसभेच्या आखाड्यात उतरायचंच हा निर्णय केवळ समर्थक म्हणताहेत म्हणून मोहिते-पाटील कुटुंबियांनी घेतलेला नाही. हा निर्णय घेण्याच्या पार्श्वभूमीवर मोहिते-पाटील परिवारामधील सदस्यांची बैठक झाली. सगळ्या शक्यता, अडथळे, जमेच्या बाजू..पडत्या बाजू...हे सगळं सगळं पुन्हा पुन्हा आजमावून पाहिलं गेलं अन् शेवट निर्णय घेण्यात आला...हर हर महादेव..!**



रणजितदादांना भाजपानं विधान परिषदेची आमदारकी दिली, आपल्या कारखान्याला मदत केली, संघटक म्हणून पक्षाचं पद दिलं ...विकास कामांच्या मंजुऱ्या दिल्या...इतकेच काय तर प्रत्येक वेळी मदत केली...त्याच भाजपाच्याच विरोधात लढायचं कसं? हा मोठा बाका प्रसंग...तथापि, राज्याच्या राजकारणाच्या अनुभवाची शिदोरी असलेल्या मोहिते-पाटील यांनी 'साप तर मेला पाहिजे, पण काठीदेखील नाही तुटली पाहिजे' असा विचार केला. माढ्यातून भाजपाविरोधी लढताना रणजितदादा यांची अडचण आहे, तर त्यांनाच आपण आपल्या परिवाराच्या वतीने निवडणूक लढविताना बाजूला ठेऊया. ते भाजपच राहतील असे ठरवून निवडणूक लढविल्यास रणजितदादांची अडचण येणार नाही, या निर्णयावर सदस्यांनी शिक्कामोर्तब केलं.

रणजितदादांसाठी घेतलेला निर्णय परिपक्वतेचा व घरातील ज्येष्ठ-श्रेष्ठांच्या शब्दाला किती मान असतो हे अधोरेखित करणारा आहे. लोकसभेसाठी रणजितदादांना वाळीत टाकलं. ८ तारखेपर्यंत घराबाहेर काढण्याचा निर्णय घेतला गेला, जो रणजितदादांनीदेखील मान्य केला. हे मोहिते-पाटील परिवारानं सांगणं खूप काही सांगून जाणारं आहे.

निवडणूक लढवताना परिवारातील रणजितदादांना त्रास व्हायला नको, याची दक्षता या परिवारानं घेतल्याचं दिसतं. जर लढताना रणजितदादा परिवारासोबत आले. धैर्यशीलभैया यांचं काम करू लागले तर भाजपा त्यांना त्याची किंमत मोजायला लावेल हा विषय होताच. त्यांची आमदारकी धोक्यात येणार, केलेल्या मदतीबद्दल भाजपा विचारणार...त्याशिवाय भाजपामध्येच राहून जर रणजितदादा धैर्यशीलभैय्या यांच्या निवडणुकीसाठी बाहेर पडले तर विश्वास कोण ठेवणार नाही, घरातील ज्येष्ठ माणसाने सांगितले की, रणजितदादांना आम्ही वेगळे ठेवले, निवडणुकीत घेतलेच नाही, ते कशात नाहीत हेच धोरण आखल्यास ते सेफ राहतील आणि मोहिते-पाटील परिवार सुरक्षितपणे माढ्याची इलेक्शन लढवू शकेल. पण, रणजितदादा धैर्यशीलभैया यांच्या प्रचारात सक्रिय झालेले दिसणार नाहीत. परिवाराच्या निर्णयानुसार या निवडणुकीत रणजितदादा दिसतील आणि भाजपा त्यांना पकडेल असे काही होणार नाही, याच्या दक्षतेचे धोरण ठरविले. रणजितदादांचे हित पाहतानाच पण लढण्याच्या निर्णयावर मोहरही उमटवली.

नाईक-निंबाळकर यांच्यासारख्या सक्षम उमेदवारासोबत लढताना निभाव लागेल का? हा प्रश्न होता. बुजुर्ग मोहिते-पाटील यांनी त्यावर उत्तर मिळवायचं ठरविलं. रणजितदादा वगळता परिवारातील सगळ्या सदस्यांनी मतदार संघ पिंजून काढत आपल्या बाजूनं जनमत आहे का? हे जाणून घेतलं. प्रत्येक ठिकाणी मिळालेलं समर्थन, केलेलं स्वागत आणि लढा, आम्ही सोबत आहोत हा दिलेला विश्वास निवडणूक लढण्याचा विश्वास देणारा ठरला. माढ्यातून लोकसभेची निवडणूक लढवायची, हा काही मोहिते-पाटील यांनी घेतलेला तत्कालीक निर्णय अजिबात नव्हता. दोन वर्षांपासून निवडणूक लढायचीच म्हणून मोहिते-पाटील परिवाराने तयारी ठेवली होती. फक्त उमेदवारीचा धैर्यशील या चेहऱ्याचा पत्ता लवकर ओपन केला नव्हता. त्या आधारे 'आमचं ठरलंय' ही टॅगलाईन मोहिते-पाटील आणि समर्थकांनी वापरली.

### दादा, आम्ही खरं सांगायला आलोय!

माढा मतदार संघात अजित पवार राष्ट्रवादी गटाचा उमेदवार हवा, अशी कार्यकर्त्यांची मागणी आहे, याचा विचार करता माढ्याची उमेदवारी बदलण्यात यावी, या मतदार संघात केवळ भाजपाच्यावतीने एक कलमी कार्यक्रम सुरु आहे. अजित पवार राष्ट्रवादी गटाचे काही नाही. खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांचे काम कार्यकर्ते करायला तयार नाहीत, असे आज बुधवारी पुण्यात झालेल्या बैंठकीत रामराजे निंबाळकर गटाच्यावतीने सांगण्यात आले. आम्ही बरं बोलायला नव्हे तर खरं बोलायला आलो आहोत असेही यावेळी पदाधिकारी अजित पवारांना म्हणाले. दरम्यान, रामराजे निंबाळकर गटाच्या या मागणीवर कोणतेच जाहीर उत्तर दिले नाही.

---

## बीजेपी, बीजेपी करणाऱ्या

# मुलांची शेंडी नाय सोडणार

## लंगोट धरून त्यांना

# तुतारी वाजवायला लावणार

**प्रश्न : भाजपानं उमेदवारी न दिल्यामुळं काय होणार ?**

**बाळदादा :** विधानसभेच्या भाजपाच्या सीटसुद्धा गेल्या.. माळशिरस, करमाळा, माढा, सांगोला या भाजपाच्या विधानसभेच्या सीट्ससुद्धा गेल्या... आता धनुष्यबाणाच्या येणार...हे निश्चितपणे.. तवाचं वातावरण वेगळं होतं...आताचं वातावरण वेगळं हाय.

**✻ प्रश्न : मोहिते-पाटील गटानं काय ठरवलंय?**

**बाळदादा :** आम्ही ठरविल्या की 'तुतारी' हातात घ्यायची... आता फक्त जरा पवार साहेबांशी चर्चा करायचीय...म्हणूनच भैया किंवा हे बोलत नाहीत...

**✻ प्रश्न: रणजितदादांचा काय?**


**बाळदादा :** महत्त्वाचं बघा...आम्ही रणजितदादांना वाळीत टाकलेलं हाय. रणजितदादाला सांगितलंय ८ तारखेला तू आमच्याबरोबर बसायचं...तोपर्यंत आमच्याबरोबर बसायचं नाही...तू आणि तुझे फडणवीस साहेब आणि सगळे...

**✻ पवार साहेबांची भेट कधी होणार आहे?**

**बाळदादा :** नाही ते आमचं चालंलय जरा...आमचं कसं आहे...थोडंसं गणित चाललय जरा...पण १०० टक्के झालंय...पवार साहेबांनी पण मान्य केलंय....आम्ही पण मान्य केलंय...आमची मुलं तर काय बीजेपी...बीजेपी...बीजेपी करताहेत...पण मी हेंची शिंडी काय सोडत न्हाय...त्यांना मी तुतारीच वाजवायला लावणार हाय...भैयाला...रणजितदादा..(सावरुन बोलत) रणजितदादाला नाही...रणजितदादा येत नाही...(पुढे बोलणे चालू ठेवत) भैयाला सांगणार कसला तो अध्यक्ष ...काय तर हाय की ते...बीजेपीचे (नेमका शब्द आठवेना त्यावेळी समोरच्याला विचारून काय रे ते) संघटक....त्याचा राजीनामा द्यायला सांगणार पहिला...सगळं आमचे तालुक्यातले...किंवा मतदार संघातले...आमचे कार्यकर्ते... सगळ्यांना सांगणार आहे...एक दिवस ठरवायचा अन् सगळ्यांचे राजीनामे सादर करायचे...काय असतील हजार-दहा हजार एक हजार ( शब्द उच्चारण्यासाठी अडखळल्यागत आणि पुन्हा लगेच मूळ ठेक्यावर येत) आमचं ठरलंय तुतारी! (पुढे बोलणे चालूच ठेवत) भैया ही म्हणतेय संघटक हाय...एक आमदार हाय... हे म्हणून टाळतेत..पण आम्ही कुठल्या पक्षाचं नाही...(ठासून) आमचा पक्ष एकच 'विजयदादा'

**✻ प्रश्न: भैया ऐकणार का तुमचं ?**

**बाळदादा :** (मोठ्या आत्मविश्वासनं हाताची अॅक्शन करत) त्याला काय शेंडी धरून करतो मी. रणजितदादाचं कसं हाय... आमदार हाय तो त्याला काय बोलता येत न्हाय.पण भैयाची शेंडी धरतो की त्याला काय. निश्चितपणानं आमचं ठरलंय तुतारी! (पुढं बोलणं चालू ठेवत) फक्त आम्ही का गप्प बसतोय...पवार साहेंबासोबत चर्चा झाल्याशिवाय...त्यांनी हो म्हणल्याशिवाय सांगणं चुकीचं हाय..म्हणून धैर्यशीलभैयासुध्दा गप्प बसलाय..तिथं फायनल झाल पाहिजे पवारसाहेबांसमोर. म्हणून धैर्यशीलभैया होय म्हण ना!



**प्रश्न : वादळी पूर्वीची शांतता म्हणायची का?**

**बाळदादा :** न्हाय शांतता तर हाय...वादळ आधीच आलय.... आता कसं हाय सुनामी आलेय...सुनामी आलेय बीजेपीच्या विरोधात...आमच्या मतदार संघात...( अधिक माहिती देण्यासाठी बोलणे चालूच ठेवत) आता काय आहे माहिती आहे का... रणजितदादा भितोय फडणवीसाहेबांना...फडणवीसाहेबांनी सहकार्य केलं...एवढं केलं..त्यांना कसं डावलायचं? प्रश्न पडलाय...नैतिक प्रश्न पडलाय...पण आम्ही काय फडणवीस साहेबांना ओळखत पण न्हाय...आम्हाला ओळखत नाहीत...त्यामुळे आम्हाला काय..पहिल्यापासनं आम्ही काय कोणत्या पक्षाचं सभासद न्हाय...राष्ट्रवादीचं पण नव्हतो...बीजेपीचं पण न्हाय..अन् कुठल्याच पक्षाचं न्हाय...आमचा पक्ष फक्त विजयदादा. (पुढे बोलणं चालू ठेवत) या



निवडणुकीमध्ये आम्ही आढावा घेतलाय... आमच्या तालुक्याचा... संपूर्ण मतदार संघाचा...ह्या मतदार संघामध्ये कुणीसुद्धा कमळाचं नाव काढत नाही...आमचे कार्यकर्ते...कुणीसुद्धा नाव काढत नाही... सगळे तुतारी वाजवा म्हणताहेत...आम्ही सगळे तुतारी वाजवणार हाय...(पत्रकारांकडे हात करत) मला माहिती असतं हिंतं तुम्ही येणार हाय तर आधीच दहा बारा तुताऱ्या आणून उभा केल्या असतं अन् वाजवल्या असत्या तुमच्यासमोर ..(तोंडाने तुतारीचा आवाज काढत) तुय... तुय.. तुय... (पत्रकार मिष्कीलपणे म्हण-तात आणा तुताऱ्या थांबतो आम्ही...यावर पुढे उत्तर देत) आता नको...जवा काय असतंय तवाच...त्या दिवशीच वाजवायच्या होत्या.मागच्या वेळी सगळ्या नेत्यांची मिटींग झाली...शेवटी कसं हाय ज्येष्ठ नेतेमंडळी आहेत...त्यांना सगळं अडचणीचं होतय्...पण रणजितदादाला आम्ही घरातनं बाहेर काढलाय...तू ...तुझा पक्ष...८ तारखेला घरात यायचं...

**प्रश्न : पवार साहेबांची भेट ७ तारखेला आहे की...**

**बाळदादा :** नाही अजून तसं ठरायचंय.दादा आणि पवार साहेब बोलतील. पण प्राथमिक चर्चा झालेली आहे. भैया उभा नाही राहिला तर त्याची लंगोट सोडून आम्ही उभा करू.